महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website: www.mahaprisons.gov.in

# महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा वार्तापत्र

माहे - डिंसेबर-२०२५

शुभेच्छा संदेश

## संपादकीय संदेश



श्री.सुहास वारके
अपर पोलीस महासंचालक व कारागृह
महानिरीक्षक व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रिय सर्व अधिकारी व कर्मचारी,

महाराष्ट्र राज्याच्या कारागृह प्रशासनाची जबाबदारी अत्यंत संवेदनशील, आव्हानात्मक व समाजहितासाठी महत्त्वाची आहे. बंदिवानांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांचे सुधारणा, पुनर्वसन व मानवतावादी दृष्टिकोनातून कार्य करणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे.

दरवर्षीप्रमाणे दिनांक 10 डिसेंबर रोजी जागतिक मानवाधिकार दिन साजरा करण्यात येतो. मानवाधिकारांविषयी जनजागृती करणे, कैद्यांमध्ये कायदेविषयक माहिती व मानवी मूल्यांची जाणीव निर्माण करणे तसेच सुधारणा व पुनर्वसनाच्या उद्देशाने हा दिवस महत्त्वाचा आहे.

**शुभेच्छा संदेश**

त्याअनुषंगाने, सर्व महाराष्ट्रातील कारागृहांमध्ये दिनांक 10 डिसेंबर रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA), संबंधित न्यायालयीन अधिकारी, तसेच मानवाधिकार क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य / संस्था / यांच्या सहकार्याने कार्यक्रमांतर्गत मानवाधिकार विषयक व्याख्यान / मार्गदर्शन, कैद्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांची व कायदेविषयक तरतुदींची माहिती, विधी सेवा प्राधिकरणामार्फत कायदेविषयक सल्ला शिबिर यासंबंधी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नवीन वर्षातही आपण सर्वांनी संघभावनेने, सकारात्मक दृष्टिकोनातून, नियम व कायद्यांचे काटेकोर पालन करत कारागृह प्रशासन अधिक कार्यक्षम व लोकाभिमुख बनवावे, अशी अपेक्षा आहे.

येणारे २०२६ नवीन वर्ष आपणा सर्वांसाठी आरोग्यदायी, यशस्वी व समाधानकारक ठरो, हिच सदिच्छा.

**जय हिंद....**

**मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मुंबई शहर व मुंबई उपनगर यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

## मुंबई मध्यवर्ती कारागृह

आज दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मुंबई शहर व मुंबई उपनगर यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री अनंत बदर, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई व श्री मुकुल चितळे, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उपनगर आणि हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच या प्रसंगी श्री राजतिलक रोशन, पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा मुंबई हे ही उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोज दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये मा.श्री.सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व कारागृहात सुरू असलेल्या फोन सुविधा, व्हिडिओ मुलाखत, गळाभेट, कायदेविषयक मदत, poor prisoners करीता सुरू असलेले उपक्रम तसेच बंद्यांकरीता मुक्त विद्यापिठामार्फत उच्च शिक्षणाची व सामाजिक संस्थांच्या मदतीने व्यावसयिक प्रशिक्षणाची सोय याबाबत माहिती दिली. सदर कार्यक्रमामध्ये कारागृह अधीक्षक श्री हर्षद अहिरराव यांनी मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे बंद्याच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या विविध स्तुत्य उपक्रमांचा आढावा घेतला. यानंतर श्री राजतिलक रोशन, पोलिस उप आयुक्त, गुन्हे शाखा मुंबई यांनी बंदी बांधवांना मार्गदर्शन केले. त्यानंतर कारागृहातील न्यायाधीन बंदी परमजित अहलावत आणि अभिजित सुर्वे यांनी मनोगत व्यक्त करून कारागृहात त्यांना मिळत असलेल्या सोयी सुविधांसाठी कारागृह प्रशासनाचे आभार मानले.

कार्यक्रमाचे शेवटी श्री अनंत बदर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कारागृहात सुरू असलेल्या सर्व उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले. तसेच बंद्यांना त्यांचे मानवी हक्काची माहिती मिळावी या उद्देशाने "कैद्यांच्या मानवी हक्काबाबत वैधानिक जागरुकता" या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास कारागृहातील सर्व अधिकारी, कर्मचारी, विधी महाविद्यालयातील विद्यार्थी कारागृहात काम करीत असलेल्या विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचा लाभ ७५० बंदी बांधवांनी घेतला.






**नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात "आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन" साजरा करण्यात आला.**

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

दिनांक 10 डिसेंबर 2025 रोजी नशिकरोड मध्यवर्ती कारागृहात "आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन" साजरा करण्यात आला. सन्मा. मुख्य न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या सहमतीने व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचे आदेशान्वये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सर्व कारागृहांमध्ये मानवी हक्क दिन साजरा करण्याचे निश्चीत करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दिवाणी न्यायाधिश ( वरीष्ठ स्तर) तथा नाशिक जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाचे सचिव सन्मा. सुहास भोसले यांनी भुषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात विधीसेवा प्राधिकरणाचे सचिव मा. सुहास भोसले यांनी भारतीय राज्य घटनेतील नमूद मुलभूत अधिकार व मानवाधिकार यांचा तुलनात्मक आढावा घेऊन मानवाधिकाराच्या इतिहासावर विस्तृत भाष्य केले तसेच कारागृहातील न्यायाधीन बंद्यांच्या जामिनाबाबत उपलब्ध तरतुदींबाबत सखोल मार्गदर्शन केले.

कारागृह उपमहानिरीक्षक तथा अधिक्षक श्रीमती अरुणा मुगूटराव यांनी समारोपाच्या भाषणात 10 डिसेंबर ही केवळ तारीख नसून मानवी हक्कांचा उदघोष करणारा हा दिवस असल्याचे नमूद करुन उपस्थीत मान्यवरांचे आभार मानले. या प्रसंगी नाशिकरोड विभागाच्या पोलीस उपअधिक्षक श्रीमती निकम मॅडम, कारागृहाचे अतिरीक्त अधिक्षक सचिन चिकणे तसेच नाशिक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सहाय्यक अधिक्षक श्री. प्रविण पोहरे, प्राधिकरणाचे सहाय्यक अभियोक्ता श्री. दुर्गेश पोखळे व कारागृहाचे सर्व अधिकारी, कर्मचारी इ. मान्यवर उपस्थित होते.






**ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे मा. श्री. प्रदीपकुमार डांगे (भा.प्र.से.), सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या उपस्थित “आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन” साजरा करण्यात आला.**

# ठाणे मध्यवर्ती कारागृह

दिनांक : १० डिसेंबर २०२५ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे मा. श्री. प्रदीपकुमार डांगे (भा.प्र.से.), सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई; मा. श्री. सुहास वारके (भा.पो.से.), अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे; तसेच मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक यांच्या संकल्पनेनुसार ठाणे मध्यवर्ती कारागृहात “आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन” विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन मा. श्री. रविंद्र पाजनकर, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे व श्रीमती राणी रा. भोसले, अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या कार्यक्रमास मा. डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी, ठाणे तसेच मा. श्रीमती. व्ही. एम. भोसले, जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या निमित्ताने “ कारागृहातील बंद्यांच्या मानवी हक्कांबाबत जागृती कार्यक्रम” आयोजित करण्यात आला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,ठाणे येथील दोन विधीज्ञांनी कारागृहातील बंद्यांना मानवी हक्क, त्यांच्या संरक्षणाच्या तरतुदी व उपलब्ध कायदेशीर सहाय्य याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास अधीक्षक श्रीमती राणी रा. भोसले, उपअधीक्षक श्री. डी. टी. डाबेराव, उपअधीक्षक श्री. विलास कापडे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. के. पी. भवर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.






**तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे “आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस” उत्साहात साजरा करण्यात आला**

## तळोजा मध्यवर्ती कारागृह

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे मा.मुख्य न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या सहमतीनुसार व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे संयुक्त विद्यमाने तसेच कारागृह अधीक्षक श्री. प्रमोद वाघ यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली “आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस” मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित प्रमुख पाहुणे व मान्यवर यांचे मा. अधीक्षक श्री. प्रमोद वाघ यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी नवी मुंबई पोलीस मुख्यालयाचे मा. आर.पी.आय. श्री. वाघमोडे सो. तसेच ट्रान्सजेंडर हक्क आणि संरक्षण आणि कल्याण मंडळ, मुबंई विभाग चे सह-अध्यक्ष, सोनाली प्रदीप चौकेकर, तसेच निलोफर म्हस्के यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी तालुका विधी सेवा समिती , पनवेल येथील विधीज्ञ अॅड. महेश गुंजाळ, अॅड. इंद्रजीत भोसले, अॅड.सुयश कामेरकर त्याचप्रमाणे तालुका विधी सेवा समिती , बेलापूर येथील विधीज्ञ अॅड.मदन घरत , अॅड.सुशील हाटे, अॅड.प्रेमजी नितनवरे, अॅड.श्रीमती अंजना गजाकोष, अॅड.श्रीमती स्वाती मोरे, अॅड.श्रीमती सुषमा जोशी इत्यादिनी मानवी हक्क व त्याचे संरक्षणाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. कारागृह अधीक्षक श्री.प्रमोद वाघ यांनी बंद्यांना त्यांचे मानवी हक्क या संदर्भातील कायद्याचे महत्व विषद करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व. तू. अ. मा. राहुल झूटाळे व शि.धनाजी यमगर यांनी केले.



**जागतिक मानवी हक्क दिन कार्याक्रमाकरीता प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. संजय कुमार सदस्य, महाराष्ट्र मानवी हक्क आयोग, मुंबई उपस्थित होते.**

## संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस १० डिसेंबर २०२५ रोजी छ. संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे बंदयांसाठी कैद्यांचे मानवी हक्क आणि संरक्षण या विषयावर कायदेविषय जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जागतिक मानवी हक्क दिन कार्याक्रमाकरीता प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. संजय कुमार (से.नि.भो.पो.से.) सदस्य, महाराष्ट्र मानवी हक्क आयोग, मुंबई उपस्थित होते. त्याचप्रमाणे कार्यक्रमास मा.श्रीमती वैशाली फडणीस, सचिव ,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,छत्रपती संभाजीनगर, मा.श्री.अनिल खामकर, अधीक्षक, मा.श्री.सचिन साळवे, अति. अधीक्षक, मा.श्री.डॉ.शिरीष कुलकर्णी, प्रा.नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी,छत्रपती संभाजनगर, मा.श्री. एस. पी. भुतेकर, उपअधीक्षक, श्री. विपुल शर्मा,अध्यक्ष लायन्स क्लब व ॲड.श्रीमती संध्या राजपूत (एल.ए.डी.सी.) आणि लिगल एड क्लिनीक चे विधीज्ञ उपस्थित होते.



## सोलापूर जिल्हा कारागृह

**सोलापूर जिल्हा कारागृहामध्ये आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस साजरा**

सन्मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सहमतीने व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचे आदेशाने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग व महाराष्ट्र राज्य जिल्हा विधी सेवा प्राधीकरण, सोलापूर व सोलापूर जिल्हा कारागृह यांच्या समन्वयाने कारागृहामध्ये आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस बंदी बांधवांच्या विवीध मानवी हक्क व संरक्षणाबाबत जागृती करणेसाठी साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमामध्ये मा. धर्मादाय आयुक्त श्री ईश्वर सुर्यवंशी यांनी भारतीय राज्य घटनेने सर्वांना दिलेले अधीकार तसेच कारागृहातील बंदयांचे हक्क याबाबत विवीध मार्मीक उदाहरणे देवून बंदी बांधवांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्तावीकेमध्ये कारागृह अधीक्षक श्री सुशील कुंभार यांनी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस साजरा करण्याचा उददेश आणी कारागृहातील बंदयांना देण्यात येणा-या मुलभूत व इतर सुवीधा याबाबत सवीस्तर माहिती दिली. जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे सचिव श्री प्रशांत पेटकर, अतिरीक्त पोलीस अधीक्षक श्री प्रितम यावलकर यांनी बंदी बांधवांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे विधीज्ञ श्री शिवकैलास झुरळे यांनी केले तर आभार प्रदर्शन कारागृह शिक्षक श्री अंगद गव्हाणे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी वरीष्ठ तुरूंगाधीकारी श्री हिदायत तांबोळी, श्री बिरू खळबुटे, श्री निलेश गायकवाड उपस्थीत होते.






**बंदयांना विपश्यनाबाबत समुपदेशन व मार्गदर्शन**

सोलापूर विपश्यना समिती, विपश्यना केंद्र यांचे मार्फत बंदयांना विपश्यनाबाबत समुपदेशन व मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विपश्यनाचे मानवी जीवनातील महत्त्व, विपश्यना शरीर व मन यांना एकत्र ठेवून त्यांना ऊर्जा प्रदान करून जीवन समृध्द करते. तसेच ध्यान-धारणा व ध्यानाचे महत्त्व आणी श्वासावर नियंत्रण याबाबत बदंयाना समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे

**नवनियुक्त कारागृह शिपाई प्रशिक्षणार्थी तु.क्र. 123 यांचा दीक्षांत संचलन सोहळा**

आज दि. 23.12.2025 रोजी सकाळी 8.00 वा. दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे येथे नवनियुक्त कारागृह शिपाई प्रशिक्षणार्थी तु.क्र. 123 यांचा दीक्षांत संचलन सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात संस्थेच्या कवायत मैदानावर पार पडला. या भव्य दीक्षांत संचलन समारोह कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. दत्तात्रय देविदास पडसलगीकर, भा.पो.से. संचालक, महाराष्ट्र इंटेलिजेंस अकादमी, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 01 रामटेकडी, पुणे हे होते. तसेच मा. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह मुख्यालय, पुणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच मा. सुनिल ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग, पुणे, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. नितिन वायचळ, मंचावर उपस्थित होते.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# दीक्षांत संचलन सोहळा

## दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे

तुकडी क्र. 123 मध्ये 199 प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे. प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात प्रशिक्षणार्थीची संख्या असून त्यामध्ये 70 महिला प्रशिक्षणार्थीचा सहभाग उल्लेखनीय होता. आजच्या दीक्षांत संचलन परेडचे नेतृत्व महिला प्रशिक्षणार्थी श्रीमती रुपाली विष्णू मलपुरे यांनी केले.

आपल्या पाच महिन्याच्या अथक परिश्रमाने आपल्या बरोबरीच्या प्रशिक्षणर्थीना मागे टाकून उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी व वर्ग अभ्यास परीक्षेत प्रथम येणेचा बहुमान श्रीमती वैष्णवी भिमाजी फापाळे हिने मिळविला. तसेच गोळीबार परीक्षेत सर्व प्रथम श्री. प्रसाद बबन कातोरे व मैदानी परीक्षेत श्रीमती रुपाली विष्णू मलपुरे यांनी बाजी मारलेली आहे. यावेळी विजेत्या बक्षिसपात्र प्रशिक्षणार्थीना मा. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.







# दीक्षांत संचलन सोहळा

## दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे

मा. महोदय, श्री. दत्तात्रय देविदास पडसलगीकर, भा.पो.से. संचालक, महाराष्ट्र इंटेलिजेंस अकादमी, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 01 रामटेकडी, पुणे यांनी भाषणात सांगितले आहे, “प्रशिक्षणार्थी यांनी त्यांना मिळालेल्या प्रशिक्षणाचा आपल्या कर्तव्य ठिकाणी चांगल्या पध्दतीने उपयोग करून घ्यावा, कारागृह विभागात काम करत असताना बंद्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करून कारागृह सुरक्षा अबाधीत ठेवण्यासाठी प्रसंगावधान राखून त्वरीत निर्णय क्षमता वापरावी लागेल. यासोबतच मा. महोदयांनी प्रशिक्षण सत्रातील विशेष प्रावीण्य संपादन केलेल्या प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले तसेच तुकडीतील सर्वांचे अभिनंदन करून त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच मा. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था राहण्याकरिता व कारागृह विभागात बंद्यांकरिता कोणकोणते विविध उपक्रम राबविले जातात याबद्दल माहिती दिली.

सदर कार्यक्रमास दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयाचे अति. अधीक्षक, श्री. एच. एस. मिंड, वरिष्ठ तुरुंग अधिकारी श्रीमती शैला वाघ, पी. टी. आय. श्री. पी. बी. उकरंडे, तु. अ. श्रेणी 1, श्री. एन. आर. साबळे, तु.अ.श्रेणी 1, श्री. काशिनाथ केंगले, तु.अ.श्रेणी 1, श्रीमती परवीन तडवी- तु.अ.श्रेणी 2 इ. तसेच संस्थेतील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.







महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# अकोला जिल्हा कारागृह

**मा. श्री. श्री. रुलर डेव्हलमेंट प्रोग्राम ट्रस्ट, आट्र ऑफ लिविंग यांचे मार्फत बंद्यांना असिस्टंट इलेक्ट्रीशन कोर्स**

मा. श्री. श्री. रुलर डेव्हलमेंट प्रोग्राम ट्रस्ट, आट्र ऑफ लिविंग इंटरनॅशनल सेंटर २१, कानपुर रोड, बेंगलोर साऊथ, कर्नाटक यांचे मार्फत बंद्यांना असिस्टंट इलेक्ट्रीशन कोर्स प्रशिक्षण





**आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस १० डिसेंबर कारागृहात साजरा**

अकोला जिल्हा कारागृह आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस १० डिसेंबर कारागृहात साजरा करण्यात आलेला असुन बंद्याना त्याबाबत योग्य विधी सेवा प्राधीकरण यांचे कडील अधिवक्ता यांचे मार्फत मर्गदर्शन करण्यात आलेले आहे.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## ठाणे मध्यवर्ती कारागृह

**पुरुष बंदयासाठी समता फांऊडेशन या सेवाभावी संस्थेच्या वतीने त्वचारोग वैद्यकीय शिबीराचे आयोजन**

दिनांक ०५.१२.२०२५ रोजी, ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे प्रिझन मिनिस्ट्री इंडिया, मुंबई या अशासकीय सामाजिक संस्थेच्या वतीने कारागृहात महिला बंदयासाठी महिला बंदयासाठी आरोग्यविषयक जनजागृती कार्यशाळा व सामान्य रुग्ण तपासनी शिबीर घेण्यात आले. सदर शिबीरामध्ये एकूण ६० महिला बंदयाची तपासनी करुन त्यांना विटामीन-डी च्या गोळयांचे वाटप करण्यात आले आहे.

तसेच पुरुष बंदयासाठी समता फांऊडेशन या सेवाभावी संस्थेच्या वतीने त्वचारोग वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.रवि यादव यांनी बंदयाची तपासनी करून १०३ बंदयांवर उपचार केले.



**कॅन्सर पेशंट ऐड असोशियसन्स, महालक्ष्मी मुंबई या संस्थेच्यावतीने महिला बंदीसाठी कर्करोग तपासनी शिबीराचे आयोजन**

दिनांक १७/१२/२०२५ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह,ठाणे येथे कॅन्सर पेशंट ऐड असोशियसन्स, महालक्ष्मी मुंबई या संस्थेच्यावतीने महिला बंदीसाठी कर्करोग तपासनी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिरामध्ये कॅन्सर अजारासंबधी महिलांचे समुपदेशन करुन, रक्तदाब तपासनी, मुखरोग तपासनी, कान,नाक,घसा तपासनी, तसेच स्त्रीरोग चिकित्सा करण्यात आली सदर शिबिराचा १२२ महिला बंदयांनी लाभ घेतला आहे.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास कार्यक्रम (MSSDS) व ग्रामीण प्रगती फाऊनडेशन यांचे सयुंक्त विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी "होम हेल्थ ट्रेनी" (रुग्ण सहाय्यक) या प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.**

**"ग्लोबल केअर फाउनडेशन, मुंबई" यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्याकरिता लीगल एड सर्विसेस बाबत माहिती, बंदी हक्क जनजागृती व प्रबोधन**

# तळोजा मध्यवर्ती कारागृह

दि.४ डिसेंबर २०२५ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ यांच्या प्रमुख मार्गदर्शन व सुचने नुसार, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास कार्यक्रम (MSSDS) व ग्रामीण प्रगती फाऊनडेशन यांचे सयुंक्त विद्यमाने यांचे सयुंक्त विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी "होम हेल्थ ट्रेनी" (रुग्ण सहाय्यक) या प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. सदर प्रसंगी अति. अधीक्षक मा. श्री. गोविंद राठोड व वरिष्ठ तुरुंगाधिकारी मा. श्री. राहुल जूटाळे व अन्य कर्मचारी व प्रशिक्षण घेऊ इच्छीणारे बंदीजन उपस्थित होते.



दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शन व सुचनेनुसार, "ग्लोबल केअर फाउनडेशन, मुंबई" यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्याकरिता लीगल एड सर्विसेस बाबत माहिती, बंदी हक्क जनजागृती व प्रबोधन कार्यक्रम आयोजित केला गेला.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# तळोजा मध्यवर्ती कारागृह

**तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे बंद्यासाठी मराठी-हिंदी संगीताचा कार्यक्रम "साज और आवाज" अश्रफ खान व टीम यांनी सादर केला.**

दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे बंद्यासाठी मराठी-हिंदी गीत/संगीताचा कार्यक्रम "साज और आवाज" अश्रफ खान व टीम यांनी सादर केला. सदर कार्यक्रमासाठी कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो, अति. अधीक्षक मा. श्री. गोविंद राठोड सो व वरिष्ठ तुरुंगाधिकारी मा. श्री. राहुल जूटाळे व इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. सदर कार्यक्रमाचा लाभ ५७० बंद्यानी घेतला.



**"अनुग्रह वेल्फेअर असोसिएशन" यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी "बंद्यासाठी ख्रिसमस सणानिमित्ताने प्रार्थना व मनोरंजन कार्यक्रम"**

दि.२० डिसेंबर २०२५ रोजी तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहाचे अधीक्षक मा. श्री. प्रमोद वाघ सो यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली, "अनुग्रह वेल्फेअर असोसिएशन" यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यासाठी "बंद्यासाठी ख्रिसमस सणानिमित्ताने प्रार्थना व मनोरंजन कार्यक्रम" कार्यक्रम आयोजित केला गेला.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन बंदयाकडुन कविता व चित्र रेखाटून साजरा केला.**

## तळोजा मध्यवर्ती कारागृह

तळोजा मध्यवर्ती कारागृहातील बंदी "ॲड.संदेश नरेन्द्र पाटील" यांनी ०६ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी, उपेक्षित समाजातील खदखद कवितेतून मांडली आहे.

**नुसता उच्छवास ...!!**

जय भीम ने पेरलेले........ सकाळ संदेश मी जपून आहे,
जसा सूर्य आकाशास टिपून आहे.

माझ्या मनातील पेटलेल्या विचारांवर खटला लाद्लाय परिस्थितीने,
कस्टडीत टाकलीत सगळी आंकाक्षाची बने....उन्मळून गेलीत साऱ्या तर्कांची माळराने...
पण .......... पण किती दिवस .......? पण किती दिवस .......?
हि पाखर.. राहतील या कोंडवाड्यात ?

हादरदायेत.....कापतायेत ....भिंती ..... त्यांच्या केवळ उच्छवासाने !
सावधान...... थरथरतायेत भिंती त्यांच्या केवळ उच्छवासाने !



तळोजा मध्यवर्ती कारागृहातील बंदी "श्री. सुनिल दामू उंबरसडा" यांनी ०६ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी त्याचे चित्र रेखाटून महामानवाला आपली श्रद्धांजली अर्पण केली.

महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**विवो मोबाईल कंपनी व त्यांचे सी.एस.आर. कोऑर्डिनेटर हिसोआ इलेक्ट्रॉनिक, उर्मी सामाजिक संस्था, कॉर्नर मोबाईल यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा खुले कारागृह, पुणे येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.**

# येरवडा खुले कारागृह

विवो मोबाईल कंपनी व त्यांचे सी.एस.आर. कोऑर्डिनेटर हिसोआ इलेक्ट्रॉनिक, उर्मी सामाजिक संस्था, कॉर्नर मोबाईल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३०.१२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता येरवडा खुले कारागृह, पुणे येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रमासाठी मा.श्रीमती चंदा धबाले, न्यायाधीश तथा असिस्टंट रजिस्ट्रार, नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल, वेस्टर्न झोन बेंच,पुणे, मा.श्री रोहित वाकाळे, सीएसआर कॉर्डिनेटर हिसोआ इलेक्ट्रॉनिक प्रा.लि., मा.श्रीमती रेश्मा शेंडे, प्रेसिडेंट उर्मी संस्था, पुणे, मा.श्री. राहुल चुनीदास, मा.श्रीमती सायली फडके तनपुरे व इतर मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांतर्गत मान्यवरांचे हस्ते साधारण २०० नग अशोका जातीच्या झाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली. तसेच प्रमुख पाहुण्यांनी खुले कारागृहात सुरू असलेल्या नर्सरी, कुक्कुट पालन, यंत्रमाग विभाग, वृक्ष लागवड व इतर उपक्रमांची पाहणी करून प्रशंसा केली

सदर कार्यक्रमासाठी श्री. शामकांत शेडगे, अधीक्षक, येरवडा खुले कारागृह, पुणे, श्री. नागेश एम कांबळे, वरीष्ठ तुरुंगाधिकारी, कृषी अधिकारी सुधीर गांगर्डे व इतर कर्मचारी व बंदी हजर होते.





महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**कारागृह कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी ध्यानधारणा शिबिर**

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, नाशिक शाखा या संस्थेतर्फे दि.16.12.2025 ते 18.12.2025 या कालावधीत कारागृहात, कारागृह कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी "राजयोग ध्यानधारणा शिबिर" कार्यक्रम घेण्यात आला. कारागृहासारख्या जोखीमयुक्त , तणावग्रस्त व नकारात्मक वातावरणात काम करताना अधिकारी व कर्मचारी सातत्यपूर्ण तणावाचे बळी ठरतात. त्यांना या दुष्परीणामापासून दूर ठेवणे, मानसिक संतूलन व आरोग्य तंदुरुस्त ठेवणे या उद्देशाने मा. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य आणि विशेष कारागृह महानिरीक्षक मा. योगेश देसाई यांचे प्रेरणेने व मार्गदर्शनानुसार सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मा. कारागृह उपमहानिरीक्षक तथा अधिक्षक श्रीमती अरुणा मुगूटराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमांत प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, नाशिक शाखा या संस्थेचे प्रतिनीधी श्री. दिलीपभाई यांनी सोप्या भाषेत व सहजतेने करता येतील अश्या योगक्रिया व ध्यानाच्या पद्धतींचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. संस्थेच्या गोदावरी दिदी, वंदना दिदी, रोहिणी बहेन व महेंद्र भाई या सर्वांनी मानवी जिवनात मानसिक संतूलन व आरोग्य तंदुरुस्तीचे महत्व अधोरेखीत करुन शरीराला जशी विश्रांती आणी स्वच्छतेची गरज असते तशीच आपला आत्मा आणी मनाला शुद्धीची गरज असते असे प्रतिपादन केले. नकारात्मक वातावरणातही सतत सकारात्मक राहून दुस-यांना सकारात्मक उर्जेने प्रेरीत करण्याने होणा-या लाभाचे महत्व सांगून योगाची प्रात्यक्षिके करवून घेतली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. कारागृह उपमहानिरीक्षक तथा अधिक्षक श्रीमती अरुणा मुगूटराव यांनी प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, या संस्थेचे कौतूक करताना बंदीजनांसाठी अनेक संस्था असे कार्यक्रम करतात परंतू अधिकारी आणी कर्मचा-यांच्या वास्तव अडचणींचा असा विचार आज प्रथमच केला गेला याचा विशेष उल्लेख करुन या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वांचे आभार मानले.



## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

**नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात ख्रिसमस कॅरोल्सचा कार्यक्रम घेण्यात आला**

महाराष्ट्र प्रिझन मिनिस्ट्री चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर यांचे तर्फे दिनांक 22.12.2025 रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात ख्रिसमस कॅरोल्सचा कार्यक्रम घेण्यात आला. संस्थेचे पास्टर देवानंद सोना, पास्टर परेश साळवी, पास्टर स्वप्निल गवळी, पास्टर तुकाराम हजारे व पास्टर बाळासाहेब साळवे यांनी येशू ख्रिस्तांचे आदर्श विचारांवर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच सर्व मानव जातीच्या उत्थानाची व कल्याणाची कामना करणा-या प्रार्थना, शुभवचने व प्रभूचे गुणगान करणारी गिते गाऊन उपस्थित बंदीजनांना अध्यात्मिक अनुभूती दिली. अत्यंत प्रसन्न वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. कारागृहातील 54 बंद्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.




**समता फौऊंडेशन यांचे वतीने बंद्यांची त्वचा रोग तपासणी**

समता फौऊंडेशन, मुंबई यांचे वतीने डॉ. निरज दुबे यांनी दि. 18.12.2025 रोजी कारागृहांतील पुरुष बंद्यांची त्वचा रोग तपासणी करुन आवश्यक औषधोपचार केले. 210 पुरुष बंद्यानी या सेवेचा लाभ घेतला.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**ठाणे मध्यवर्ती कारागृह**

**पॅप्समिअर व मॅमोग्राफी तपासणी शिबिराचे**

**दिनांक १३ डिसेंबर २०२५**


# ठाणे मध्यवर्ती कारागृह

ठाणे मध्यवर्ती कारागृहातील महिला अधिकारी/कर्मचारी तसेच कारागृह वसाहतीतील महिला कुटुंबीय यांच्यासाठी पॅप्समिअर व मॅमोग्राफी तपासणी शिबिराचे, प्रिझन मिनिस्ट्री इंडिया, मुंबई व सेंटर फॉर पीस ट्रस्ट,मुंबई यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आले होते.सदर शिबिरामध्ये पॅप्समिअर -४२ तसेच मॅमोग्राफी-६१ महिला अधिकारी व कर्मचारी तसेच कुटुंबीय यांनी लाभ घेतला आहे.




**दंतचिकीत्सा तपासनी शिबीर**

दिनांक १२.१२.२०२५ रोजी, **प्रिझन मिनिस्ट्री इंडिया,मुंबई** या अशासकीय सामजिक संस्थेच्या माध्यमातून ठाणे मध्यवर्ती कारागृहातील बंदयांसाठी दंतचिकीत्सा तपासनी शिबीर आयोजित करण्यात आले. सदर शिबीरामध्ये १५ बंदयांची तपासनी करण्यात आली.



# ठाणे कारागृहात मातृत्वाचा सन्मान- बारशाचा आगळा-वेगळा सोहळा

## ठाणे मध्यवर्ती कारागृह

ठाणे, दि. १२ डिसेंबर २०२५ : - ठाणे मध्यवर्ती कारागृहात सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श ठेवत महिला कैद्यांसाठी मातृत्वाचा सन्मान करणारा बारशाचा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. रचनास फनक्लब, मुंबई या सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून कारागृहातील महिला बंदयांना माणुसकीचा, आपुलकीचा आणि सन्मानाचा अनुभव मिळाला. या कार्यक्रमात नवजात बालिकेसाठी नवीन कपडे, खेळणी, पाळणा, तेल, साबण, टॉवेल, पावडर, कापडी डायपर यांसारख्या आवश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. महिलांनी पाळण्यात बालिकेला झोपवून पारंपरिक पद्धतीने पाळणा गीत गायले, ज्यामुळे संपूर्ण परिसर आनंदाने आणि भावनिक वातावरणाने भारावून गेला.

बारशाच्या वेळी बालिकेच्या कानात नाव सांगण्याची परंपरा जपण्यात आली. कारागृहाच्या अधीक्षिका श्रीमती राणी रा.भोसले यांनी बालिकेच्या कानात नाव सांगितले, तर आईने बालिकेचे नाव ‘कृतिका’ असल्याचे जाहीर केले. हा क्षण सर्व उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक ठरला.

या उपक्रमाबाबत बोलताना अधीक्षिका श्रीमती राणी रा.भोसले म्हणाल्या,“कारागृहात असलेल्या महिलाही समाजाचा भाग आहेत. त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या क्षणांना सन्मान मिळणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे महिला कैद्यांमध्ये सकारात्मकता निर्माण होते व पुनर्वसनाच्या प्रक्रियेला चालना मिळते.”






**भारतीय सेवा संगती व फ्री मॅथेडिक्स चर्च लातूर यांचे मार्फत कारागृहातील बंदी करिता ख्रिसमस निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला**

## लातूर जिल्हा कारागृह

लातूर जिल्हा कारागृह येथे दिनांक 26.12.2025 रोजी भारतीय सेवा संगती व फ्री मॅथेडिक्स चर्च लातूर यांचे मार्फत कारागृहातील बंदी करिता ख्रिसमस निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमांमध्ये बंद्यांकरिता गीते गायनाद्वारे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये बंद्याना ख्रिसमस सणाबाबत माहिती देण्यात आली. तसेच पुढील जीवन चांगल्या पद्धतीने कसे जगावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. फ्री मॅथेडिक्स चर्च या संस्थेमार्फत कारागृहातील बंद्याकरिता साऊंड सिस्टिम संच भेट देण्यात आला. सदर कार्यक्रमास फादर सॅम्युएल सोनवणे, सुभान रकते, कारागृह अधीक्षक बक्सार मुलाणी, सुभेदार मुंडे, कारागृह कर्मचारी व २०० बंदी उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या जिल्हा कारागृहातील बंद्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम संपन्न**

## अलिबाग जिल्हा कारागृह

कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, त्यांचा व त्यांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा, जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम (DPC 2025-26), जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग, जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग यांच्यामार्फत पुरुष बंद्यांना दुचाकी मोटार सायकल दुरुस्ती व महिला बंद्यांकरीता ब्युटिपार्लर बेसीक व ॲडव्हांन्स कोर्सचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांना मा.जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.





यावेळी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग मा.श्रीम.तेजस्विनी निराळे, जिल्हा कौशल्य उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार, अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह विशाल बांदल यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्रांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी मा.जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, कारागृह विभागाच्या "सुधारणा व पुनर्वसन" या ब्रिद वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने किमान कौशल्य विकास डिपीसी-2025-26 अंतर्गत अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी. बंद्यांचा, स्वत:चा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा या उद्देशाने जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. ग्रामीण प्रगती फाऊंडेशन व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बंद्यांकरीता हेल्थ केअर सेक्टर अंतर्गत Home Health Trainee या कोर्ससाठी बंद्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणातून बंद्यानी चांगले प्रशिक्षण घेवून आपले जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा. तसेच प्रत्येक बंद्यांनी आपल्या आरोग्याच्या सोयी-सुविधांसाठी आयुष्यमान कार्ड काढून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. ज्या बंद्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही त्यांनी प्रशिक्षणासाठी आपला सहभाग नोंदवून प्रशिक्षण घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले

मा.सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण,रायगड-अलिबाग श्रीम.तेजस्विनी निराळे यांनी सांगितले की, नियमित जीवन जगताना कायदा खूप महत्वाचा असतो. ज्या बंद्यांनी प्रशिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्र मिळविले आहे त्यांची प्रेरणा घेवून इतर जास्तीत जास्त बंद्यांनी घेवून हे प्रशिक्षण पूर्ण करावे. बंद्यांनी जागरुकतेने आपल्याला असलेल्या सोयी-सुविधा मिळविण्याचा प्रयत्न करावा. रोजगाराच्या वेगवेगळया संधी उपलब्ध असल्याने हे प्रशिक्षण बंद्यांनी घेतल्यास बंदी आत्मनिर्भर होवून त्यांना रोजगार उपलब्ध होईल. याबाबत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## सांगली जिल्हा कारागृह

**फ्री मॅथॉडिस्ट चर्च, सांगली यांचे मार्फत थंडी निमित्ताने बंदयांना ब्लैंकेट वाटप कार्यक्रम**

सांगली जिल्हा कारागृह येथे फ्री मॅथॉडिस्ट चर्च, सांगली यांचे मार्फत गाणी व मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात येवून थंडी निमित्ताने बंदयांना ब्लैंकेट वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. त्याचा सर्व बंदयांनी लाभ घेतला.



**समता फाउंडेशन यांच्या वतीने बंदयांना चष्मा वाटापाचा कार्यक्रम**

सांगली जिल्हा कारागृह येथे दिनांक १८/१२/२०२५ रोजी सांगली जिल्हा कारागृह येथे समता फाउंडेशनचे वतीने बंदयांना चष्मा वाटापाचा कार्यक्रम करण्यात आला.



**अमरावती मध्यवर्ती कारागृहाचे IGNOU चे परीक्षा केंद्र येथे बी.ए. व एम.ए.विषयाच्या सत्र परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे**

**जीवन विदया मिशन या संस्थेकडून मानसिक सबलीकरण या विषयावर कार्यशाळेचे आयोजन**

महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## अमरावती मध्यवर्ती कारागृह

दिनांक ०१/१२/२०२५ पासून १३/०१/२०२६ पर्यंत अमरावती मध्यवर्ती कारागृहाचे IGNOU चे परीक्षाकेंद्र क्र.३६०१९डी येथे बी.ए. व एम.ए.विषयाच्या सत्र परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर परीक्षे दरम्यान नागपूर विभागीय संचालक डॉ लक्ष्मण कुमारवाड यांनी भेट देऊन पाहणी केली व परीक्षा सुरळीत सुरु असल्याने समाधान व्यक्त केले.



दिनांक ०४/१२/२०२५ रोजी पासून अमरावती मध्यवर्ती कारागृहामध्ये जीवन विदया मिशन या संस्थेकडून मानसिक सबलीकरण या विषयावर प्रत्येक गुरुवारी पुरुष व महिला विभागामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.



जेल इंटेलिजन्स कमिटीची बैठक सन्मा.श्री.राकेश ओला, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे धार्मिक कट्टरतावादापासून बंद्याना परावृत्त करणेबाबत मार्गदर्शन

गीता परिवार या संस्थेच्या सहकार्याने गीता संथा वर्गाच्या ऑडिओ/व्हिडिओ लिंकचे माध्यमातून गीता संथा वर्गाचे आयोजन



## अमरावती मध्यवर्ती कारागृह

दिनांक ३१/१२/२०२५ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे जेल इंटेलिजन्स कमिटीची बैठक सन्मा.श्री.राकेश ओला, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये धार्मिक कट्टरतावादापासून बंद्याना परावृत्त करणेबाबत मार्गदर्शन करुन कारागृह सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला.



दिनांक ०४/१२/२०२५ रोजी पासून अमरावती मध्यवर्ती कारागृहामध्ये गीता परिवार या संस्थेच्या सहकार्याने गीता संथा वर्गाच्या ऑडिओ/व्हिडिओ लिंकचे माध्यमातून गीता संथा वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर ऑनलाईन वर्गासाठी कारागृहातील प्रार्थना भवन येथे ७५ इंच मोठया एलईडी टीव्हीवर इंटरनेट कनेक्शनसह सुसज्ज ऑनलाईन वर्गाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर वर्गामध्ये श्रीमद्भगवतगीता मधील अध्याय क्र. १ ते ९ अर्जूनविषादयोग, सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानकर्मसंन्यासयोग, कर्मसंन्यासयोग, आत्मसंयमयोग, ज्ञानविज्ञानयोग, अक्षरब्रम्हयोग, राजविदया राजगुह्ययोग या ९ अध्यायाचे व्हिडिओचे माध्यमातून उच्चारण व पठण बंदयांना करुन देण्यात येत आहे.

